# ऋण निर्देश

या शोधनिबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांनी मला सतत मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. सर्वप्रथम माझे मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रपाठक डॉ. अशोक चौसाळकर यांनी मला जे बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.के. कावळेकर यांनीही मला वेळो-वेळी मार्गदर्शन करून हा शोधनिबंध पूर्ण करण्यास सहकार्य केले. तसेच राज्य-शास्त्र विभागातील इतर प्राध्यापक प्रा. वासंती रासम, प्रा. नांनिवडेकर, प्रा. भारती पाटील, प्रा. लक्ष्मीनारायण यांचेही मार्गदर्शन मला मिळाले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच श्री संभाजी तोरस्कर यांनी मला वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील बॅ.खर्डेकर ग्रंथालयाचीही खूप मदत झाली. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व ग्रंथालयीन सहकारी यांचा मी आभारी आहे.

आमच्या कासेगांव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. जयंतराव पाटील, संस्थेचे सचिव मा.पा.वि. जगताप यांच्या प्रेरणेने, तसेच आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. शरद भोसले, ग्रंथपाल व माझे इतर सर्व सहकारी यांच्या बहुमोल सहकार्यामुळे तसेच माझ्या कुटुंबियांच्या सहकार्याने हा शोध निबंध पूर्ण करू शकलो. मी या सर्वांचा आभारी आहे.

या शोधनिबंधाचे काम पूर्ण करून देणारे टंकलेखक श्री विष्णू खाडे यांचाही मी आभारी आहे. तसेच या शोधनिबंधाच्या कार्यात ज्यांची मला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत झाली त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. धन्यवाद ।

कोल्हापूर

दिनांक -

- बी.जी. बोराटे

## :: अनुक्रमणिका ::


| | | | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- |
| प्रकरण पहिले | - | विषय प्रवेश | ८ ते ४१ |
| प्रकरण दुसरे | - | १) "मित्रमेळा" आणि अभिनव भारत | ४२ ते ५४ |
| | | २) सावरकरांच्या राष्ट्रवादाचे त्यांच्या कवितेतून दिसणारे रूप | ५५ ते ८७ |
| प्रकरण तिसरे | - | सावरकर आणि मॅझिनीचा राष्ट्रवाद | ८८ ते ११७ |
| प्रकरण चौथे | - | अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्यसमर | ११८ ते १५५ |
| प्रकरण पाचवे | - | सावरकरांचा हिंदी राष्ट्रवाद | १५६ ते १७० |
| | - | उपसंहार | १७१ ते १८० |
| | - | संदर्भ ग्रंथ सूची | १८१ ते १८६ |


......

# "स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचा हिंदी राष्ट्रवाद"

## प्र स्ता व ना :

स्वा. वि.दा. सावरकरांच्या दीर्घ अशा राजकीय जीवनात त्यांच्या राजकीय विचारांचे मुख्यत: तीन टप्पे पडलेले दिसतात. पहिला टप्पा १९१० पर्यंतचा "अभिनव पर्व" हा काळ होय. या काळात ते हिंदी राष्ट्रवादी नेते होते. १९११ ते १९२१ हा मधला काळ अंदमान तुरुंगात गेला. दुसरा टप्पा १९२१ ते १९३७ पर्यंतचा काळ होय. या काळात त्यांनी "सामाजिक सुधारणा आणि हिंदु राष्ट्रवादी विचार" मांडावयास सुरुवात केली. इ.स. १९३७ नंतर त्यांच्या राजकारणाचे तिसरे पर्व सुरु होते. या पर्वात त्यांनी "हिंदु राष्ट्रवादाचा प्रचार मोठया प्रमाणात केला.

स्वा. सावरकर राजकारणाच्या पहिल्या पर्वात"हिंदी राष्ट्रवादी" किंवा भारतीय राष्ट्रवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. अन्यायी आणि जुलमी ब्रिटिश राजवटीतून हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी, त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्य हेच परतंत्र हिंदुस्थानचे ध्येय आणि "रण" हा त्या स्वातंत्र्य संपादनाचा मार्ग मानला. सशस्त्र क्रांती हा मार्ग ठरविल्यानंतर त्यांनी त्या मार्गाचा आराखडा तयार केला. जनतेच्या मनांत राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना वाढीस लागण्यासाठी स्वा. सावरकरांनी लोकांना प्रथम मन:क्रांती व नंतर वास्तविक क्रांतीचे तत्त्वज्ञान शिकविले. या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी केलेल्या कार्यातून त्यांचे हिंदी राष्ट्रवादी विचार व्यक्त होतात. भारतीय स्वातंत्र्य युध्दाची शपथ, गुप्तमंडळाची आणि मित्रमेळयाची स्थापना, राष्ट्रीय स्वातंत्र्य हेच ध्येय, सशस्त्र क्रांती हेच त्यांचे साधन, ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव, राजा इंग्लंडचा की हिंदुस्थानचा, मित्रमेळयात खडाजंगी वाद, स्वदेशीचा फटका, चापेकर आणि रानडे यांजवरील फटका, बाजीप्रभू व सिंहगडाचा पोवाडा,

स्वतंत्रतेचे स्तोत्र, शत्रूच्या शिबिरात, लंडनची बातमीपत्रे, जोसेफ मॅझिनी-च्या लेखांचा अनुवाद व त्या अनुवादाला लिहिलेली प्रस्तावना, १८५७ चे स्वातंत्र्य समर इत्यादि वाङ्मयातून त्यांची हिंदी राष्ट्रवादाची भूमिका स्पष्ट होते. प्रस्तुत या शोध प्रबंधास सावरकरांच्या पहिल्या पर्वातील "हिंदी राष्ट्रवादाचा" (विचारांचा) अभ्यास करण्यात आलेला आहे.

स्वा. सावरकरांच्या राजकीय जीवनास या शतकाच्या सुरुवातीला प्रारंभ झाला. या काळात भारतीय राजकारणात फार मोठे बदल घडून येत होते. त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारांवर मुख्यत: तीन विचारधारांचा प्रभाव पडला. राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये मवाळ आणि जहाल गटात संघर्ष वाढला होता. लो. टिळक, अरविंद घोष, लाला लजपतराय इत्यादि जहाल नेत्यांच्या राजकीय विचारांचा प्रभाव भारतीय राजकारणात वाढत होता. त्यामुळे या नेत्यांच्या राजकीय विचारांचा प्रभाव स्वा. सावरकरांच्यावर पडला होता. वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू यांच्याही क्रांती कार्याचा प्रभाव त्यांच्या बालमनावर पडला. तिसरा प्रभाव जोसेफ मॅझिनी या इटालियन राष्ट्रवादी विचारवंताच्या राजकीय विचारांचा पडला होता. त्यांचे राष्ट्रवादी विचार मॅझिनीच्या विचाराने मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले. तसेच भगवान श्रीकृष्ण, छ. शिवाजी महाराज, संत रामदास यांचाही प्रभाव त्यांच्या राष्ट्रवादी विचारांवर पडला.

स्वा. सावरकरांचा "हिंदी राष्ट्रवाद" हा इंग्रजांच्या साम्राज्यशाही विरुद्ध होता. त्यांच्या मते, इंग्रजांच्या साम्राज्यशाहीने हिंदुस्थानचा सर्वांगिण ऱ्हास झालेला आहे. तेव्हा इंग्रजांची साम्राज्यशाही नष्ट केल्याशिवाय हिंदुस्थान खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार नाही. अभिनव भारताची स्थापना करताना त्यांनी आपल्या राजकीय ध्येय धोरणांची मांडणी केली. हिंदुस्थानचे

राजकीय स्वातंत्र्य कोणत्याही निशास्त्र प्रतिकाराच्या मार्गाने मिळणार नाही, त्यासाठी सशास्त्र सामुहिक लढयाची आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या मते सशस्त्र संघर्ष केल्याशिवाय जगातील कोणत्याही परतंत्र देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळणार नाही. आपल्या सशस्त्र संघर्षामध्ये गनिमीकाव्याची पध्दती स्वीकारली जाईल असे त्यांचे म्हणणे होते. निशास्त्र जनतेला उघड युध्द करता येत नाही म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी दहशातवादी मार्गाचा स्वीकार केला पाहिजे. जे राष्ट्र गुलामगिरीत असते, ते निरंतर युध्दमान असते. म्हणून हिंदी जनतेने राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी इंग्रज साम्राज्यशाहीविरूध्द सशास्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असे क्रांतीनिष्ठ राष्ट्रवादी विचार सावरकरांनी मांडले.

स्वा. सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांवर जोसेफ मॅझिनीच्या विचारांचा प्रभाव पडला होता. मॅझिनीने इटालियन राष्ट्रवाद मांडला. त्याने आपल्या राष्ट्रवादी विचारात स्वधर्म, स्वदेश, स्वराज्य, स्वातंत्र्य, राष्ट्रैक्य, समता, लोकशाही या तत्वांचा पुरस्कार केला. या तत्त्वांच्या प्राप्तीसाठी इटलीला राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, राजकीय स्वातंत्र्यासाठी इटलीच्या तरुणांनी ऑस्ट्रियन साम्राज्यशाहीविरूध्द गनिमीकाव्याने सशास्त्र संघर्ष केला पाहिजे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इटलीत राष्ट्रीय ऐक्यासाठी, समतेसाठी, सर्वांगिण विकासासाठी लोकशाही शासन पध्दती स्थापन केली जाईल, आणि इटलीचे गेलेले वैभव पुन्हा स्थापित केले जाईल असे राष्ट्रवादी विचार त्यांनी मांडले. मॅझिनीने इटलीच्या स्वातंत्र्य चळवळीला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. म्हणून सावरकरांनी मॅझिनीच्या विचारांचा पुरस्कार केला.

सावरकरांनी "१८५७ चे स्वातंत्र्य समर" या आपल्या ग्रंथास १८५७ साली हिंदी जनतेने इंग्रजांविरूध्द केलेल्या संघर्षाचे राष्ट्रवादी भूमिकेतून विश्लेषण

केले. या स्वातंत्र्ययुध्दात हिंदु=मुस्लीम, असे सर्वच लोक राष्ट्रवादी भावनेने सहभागी झाले होते. त्यांच्या मते, १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाची स्वधर्म आणि स्वराज्य ही दोन दिव्य तत्वे होती. स्वराज्य हे स्वधर्म रक्षणाचे साधन आहे. परंतु स्वधर्माचे आणि निसर्गदत्त स्वातंत्र्याचे इंग्राज राज्यकर्ते धिंडवडे काढीत आहेत असे लक्षात येताच हिंदी जनतेने इंग्राजांविरूध्द सशस्त्र संघर्ष उभारला. ईश्वरदत्त अधिकारांसाठी सशस्त्र संघर्ष करणे हे सर्व मानवजातीचे कर्तव्य आहे असे विचार त्यांनी मांडले.

अभिनव भारत पर्वात सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. या काळात त्यांनी नाशिक, पुणे, इंग्लंड इत्यादी ठिकाणी राष्ट्रवादी भूमिकेतून कार्य केले. त्यांनी हिंदी राष्ट्रवादास स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती, स्वधर्म, स्वराज्य या तत्वांना महत्तवाचे स्थान दिले. त्यांच्या मते, इंग्राजांच्या साम्राज्यशाहीने आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा आधार असणाऱ्या या तत्वांचा नाश करण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा हिंदी लोकांनी इंग्राजांविरूध्द सशस्त्र संघर्ष केला पाहिजे, आणि आपल्या मातृभूमिला स्वतंत्र केले पाहिजे. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला तुरुंगात ठेवले असता तिच्या हातून सत्कृत्ये घडून येणे शक्य नसते, त्याप्रमाणेच एखादा देश राजकीय पारतंत्र्यात असतो तोपर्यंत त्यांच्या हातून मानवी प्रगती घडणे शक्य नसते. अशा स्थितीत आपण आपल्या सर्वांच्या मुक्ततेस जबाबदार आहोत. जर आपण आपल्या सर्व बंधूना पारतंत्र्यात राहू दिले तर परमेश्वराचा द्रोह केल्याचे पाप आपल्या माथी बसेल. स्वत:ची प्रगती आणि मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे सर्वांना मुक्ती मिळेल असा प्रयत्न करणे हा होय. "आपण ज्या देशात जन्मलो, ज्याचे अन्न खाल्ले त्याची सेवा केल्याशिवाय आपणांस स्वर्गाची दारे खुली होणार नाहीत." असे विचार त्यांनी मांडले. नैसर्गिक हक्क, स्वातंत्र्य , लोकशाही इत्यादी विचारांचा पुरस्कार त्यांनी आपल्या हिंदी राष्ट्रवादात केला.

हिंदुस्थानात अनेक जाती, धर्म, भाषा, पंथ यांनी विभागलेले लोक राहतात. माणूस म्हणून जगण्यापेक्षा धर्म, पंथ, भाषा यांचा अभिमान बाळगून जगणारे हे लोक आहेत. राष्ट्र म्हणून ते अजून एकात्म झालेले नाहीत. मानवीय आणि राष्ट्रीय भावनेपेक्षा इतर क्षुद्र भावनाच या देशातील लोकांत प्रबळ आहेत याची जाणीव सावरकरांना होती. त्यामुळे या सर्वांचे एकात्म राष्ट्र कसे बनवावे ? हाच प्रश्न त्यांच्यापुढे होता. तरी-पण त्यांच्या मते आधुनिक जगात राष्ट्र (राष्ट्रवाद) हाच सर्वात मोठा मनुष्यसंघ आहे. तीच विश्वसंघाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. म्हणून त्यांनी या पर्वात हिंदी राष्ट्रवादी विचार मांडले. हिंदुस्थान हे केवळ हिंदुंचेच राष्ट्र आहे असे विचार त्यांनी या काळात कधीही मांडले नाहीत. त्यांनी या काळात हिंदु-मुस्लीम संमिश्र राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. परंतु पुढील काळात मुस्लीम हिंदी राष्ट्रवादाच्या प्रवाहात सामिल झाले नाहीत म्हणून त्यांनी हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार केला.

प्रस्तुत सावरकरांचा "हिंदी राष्ट्रवाद" या शोध प्रबंधाची मांडणी सावरकरांनी अभिनव पर्व काळात लिहिलेल्या वाङ्मयाच्या आधारे करण्यात आलेली आहे. प्रबंधात ऐतिहासिक राजकीय दृष्टिकोनातून सावरकरांच्या "हिंदी राष्ट्रवादी"विचारांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

........